

# आ.ह.

संपादक
इंद्रजित घुले । अमृत साळुंखे

## आ. ह. साळुंखे
अमृतमहोत्सवानिमित्त
## विचारग्रंथ

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| ३७ वैचारिक आधारवड | राज जाधव, बार्शी, जि.सोलापूर/२३० |
| ३८ .... आणि बळीचे राज्य येवो | डॉ. गीतांजली सुहास, सातारा/२३२ |
| ३९ महाराष्ट्राच्या मनावरची जळमटे झटकणारा प्रबोधक | विजय चोरमारे, कोल्हापूर/२३५ |
| ४० एकोणचाळीस वर्षांचा परिचय | प्रा.अर्जुन जाधव, उस्मानाबाद/२३८ |
| ४१ डॉ.साळुंखे यांचे साहित्य आणि अंधश्रद्धानिर्मूलन | प्रा.विलास खंडाईत, सातारा/२४३ |
| ४२ विलोभनीय आ.ह. | ल. सि. जाधव, सोलापूर/२४६ |
| ४३ उमाजीराजे नाईक साहित्यसंमेलनात पाहिलेला ज्ञानतपस्वी | औदुंबर बुधावले, नातेपुते/२४७ |
| ४४ असंख्य वादळांतला अचल बापमाणूस | अनुजा आशुतोष पाटील, बीड/२४९ |
| ४५ वेदनांचा 'आह' स्वर, भावी उद्‌गाराचा 'वाह' स्वर | डॉ.रवींद्र श्रावस्ती, सांगली/२५१ |
| ४६ कल्याणमित्र : सद्‌धम्माचे सम्यक भाष्यकार | अमित मेधावी, मिणचे/२५४ |
| ४७ An organic intellectual : Dr. A. H. (Salunkhe) | Dr.Shrikant Borkar, London/268 |
| ४८ डॉ.आ.ह.साळुंखे आणि वादांची वादळे | बाळासाहेब देवढे, शेवगाव, जि.अहमदनगर/२७१ |
| ✓४९ भारतातील देव-असुर संघर्षाचा ऐतिहासिक दस्तावेज | डॉ.हंसराज भोसले/२७६ |
| ५० मराठी भाषादिन, मराठी विद्यापीठ, श्रीचक्रधर स्वामी आणि डॉ.आ.ह.साळुंखे यांची भूमिका | डॉ.हंसराज जाधव, पैठण/२८४ |
| ५१ डॉ.आंबेडकरांची भूमिका आणि डॉ.साळुंखेंची विचारसरणी | पवनकुमार शिंदे, परभणी/२८८ |
| ५२ स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणाऱ्या युवकांनो | प्रा.डॉ.अमर कांबळे, इचलकरंजी, जि.कोल्हापूर/३०१ |
| ५३ संजीवक वाणीचा जिरवणीचा पाऊस | प्रा.डॉ.मानसी लाटकर, सातारा/३०३ |
| ५४ डॉ.साळुंखेंचे अनुवादकार्य | प्रा.डॉ.जयपाल सावंत, सातारा/३०८ |
| ५५ अनेकान्ती दार्शनिक | अभिषेक मिठारी, कोल्हापूर/३१३ |
| ५६ 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध'- बौद्ध संस्कृतीचा अमूल्य ठेवा | प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड, पेठ वडगाव, जि.कोल्हापूर/३२० |
| ५७ शेती-मातीवर निस्सीम प्रेम करणारा भूमिपुत्र | ॲड.सुचित्रा घोगरे-काटकर, सातारा/३२९ |
| ५८ परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सशक्त बनविणारे विवेकी चिंतन ! | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे, नांदेड/३४१ |
| ५९ कृतज्ञता हा माणसाच्या काळजाचा सुगंध आहे | निशांत सुनंदा विश्वास, कोल्हापूर/३४७ |
| ६० डॉ.आ.ह.साळुंखे यांचे 'सांस्कृतिक' द्रष्टेपण | प्रशांत नागावकर, कोल्हापूर/३५० |
| ६१ डॉ.साळुंखेंच्या सोबत प्रवास | प्रमोद तांबे, मुंबई/३५६ |
| ६२ समाजपरिवर्तनाचा विवेकी आविष्कार | डॉ.सदाशिव शामराव पाटील, सोंडोली/३६१ |
| ६३ बाल एवं युवा शिक्षण-संस्कार आणि डॉ.आ.ह.साळुंखे यांचे साहित्य | डॉ.विलास वसंतराव पाटील, चाळीसगाव/३६५ |
| ६४ कविमनाचे आ.ह.साळुंखे ! | दीपा देशमुख, पुणे/३६९ |
| ६५ बुद्ध आणि ख्रिस्तांचे अधिक स्पष्ट आकलन | फ्रान्सिस वाघमारे, नाशिक/३७४ |
| ६६ महानुभाव, मराठी भाषादिन आणि मराठी भाषा विद्यापीठ | प्रा.उमेश आकरे, नागपूर/३७७ |




Scanned with CamScanner

# भारतातील देव-असुर संघर्षाचा ऐतिहासिक दस्तावेज : बळीवंश

प्रा.डॉ.हंसराज भोसले, निलंगा, जि.लातूर

डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या प्राच्यविद्यापांडित्याच्या सर्वोच्च आविष्कारांपैकी 'बळीवंश' हा एक महत्तम ग्रंथ आहे, असे म्हटले, तर ते चुकीचे ठरणार नाही. प्राच्यविद्या या ज्ञानशाखेचा भारताला परिचय होण्यापूर्वीच महात्मा फुले यांनी आपल्या तल्लख बुद्धीने व प्रतिभासामर्थ्याने प्राच्यविद्येचा वापर केला होता. त्यानंतर प्राच्यविद्या ही ज्ञानशाखा सत्यशोधनासाठी उपयुक्त ठरू शकते, हे लक्षात घेऊन कॉ.शरद पाटील यांनी विपुल लेखन केले. तोच सत्यशोधनाचा समृद्ध वारसा डॉ.साळुंखे वर्तमानकाळात अतिशय चिकाटीने, नेटाने आणि अभ्यासपूर्ण शास्त्रीय संसाधनांच्या आधारे सक्षमपणे चालवत आहेत. त्यांची आजवरची पन्नास-पंचावन्न ग्रंथांची संपदा अभ्यासली, तर हे सहज लक्षात येण्यासारखे आहे.

महात्मा फुले ते डॉ.साळुंखे या सत्यशोधनाच्या परंपरेमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ.पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या सत्यशोधकी साखळीची कडी देखील फार मजबूत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ.साळुंखे यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास केला असता, आजच्या वर्तमानकाळात महात्मा फुले यांच्या सांस्कृतिक अन्वेषणपद्धतीला पुढे घेऊन जाण्याचे काम खऱ्या अर्थाने डॉ.साळुंखे करीत आहेत, असे म्हटले, तर ते अजिबात अतिशयोक्तीचे ठरणार नाही. उलट, आजच्या काळात अशा विचारांची नितांत गरज आहे. ती गरज पूर्ण करण्याची क्षमता डॉ.साळुंखे यांच्या साहित्यात निश्चितच आहे, असे म्हणता येईल.

प्रस्तुत लेखात डॉ.साळुंखे यांच्या 'बळीवंश' या ग्रंथाविषयीचे विवेचन प्रामुख्याने करावयाचे असल्यामुळे इतर ग्रंथांविषयीचा फक्त नामोल्लेख मात्र लेखनात येईल, हे वाचक- अभ्यासकांनी लक्षात घ्यावे. कारण, त्यांच्या लेखनातील प्रत्येक शब्द न् शब्द आणि वाक्य न् वाक्य फार मौलिक असते. जिज्ञासू अभ्यासकांनी त्यांचे ते लेखन मुळातून वाचावे, हेच चांगले.

'बळीवंश' हा चार अक्षरी शीर्षकाचा ग्रंथ. त्यांच्या सर्व ग्रंथांपैकी सर्वांत अल्पाक्षरी शीर्षकाचा आणि भारतातील देवासुर संघर्षाचा ऐतिहासिक दस्तावेज आहे. हा आणि 'सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध' हे दोन ग्रंथ लिहिणे, हे त्यांचे जीवनध्येय होते, ते त्यांनी पूर्ण केले. त्यांनी त्यांच्या लेखनात अनेक ग्रंथ लिहिण्याचा, काही मुद्द्यांवर सविस्तर आणि बृहद्- ग्रंथ लिहिण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 'बळीवंश' या ग्रंथासाठी त्यांनी लिहिलेल्या मनोगतात मात्र ''मानवी कार्यक्षमतेला आणि आयुष्याला निसर्गानेच मर्यादा घातल्या आहेत.'' असे



Scanned with CamScanner

सांगून ''माझ्या डोक्यात जे काही विचार आहेत, ते सर्वच मांडून होण्याची शक्यता नाही'', असे भावपूर्ण रीतीने नमूद केले आहे.

'बळीवंश' हा विषय लेखनासाठी त्यांनी का निवडला, हा प्रश्न अभ्यासकांच्या दृष्टीने जितका महत्त्वाचा आहे, तितकाच प्राच्यविद्या या ज्ञानशाखेच्या मांडणीसाठी देखील महत्त्वाचा आहे. महात्मा फुले यांनी त्यांच्या समग्र लेखनात 'बळीचे वंशज' असा स्वत:चा आणि असुर राजांचा निर्देश केला आहे. त्यांनी बळीचे अनुयायी म्हणून गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त आणि महंमद पैगंबर यांचाही उल्लेख केला आहे. हिंदुस्थान या देशाचा निर्देश त्यांनी 'बळीस्थान' असाही केला आहे. त्यांनी 'बळीराजा' हा अभंग तर लिहिलाच, पण 'दस्यूचा पोवाडा'ही लिहिला. आर्य हे इराणी आहेत. आक्रमक, हिंसक आणि क्रूर आहेत, असे त्यांनी छत्रपती शिवाजी राजे भोसले यांच्या पोवाड्यामध्ये (१८६९) नमूद केलेच, पण पुढील गुलामगिरी(१८७३), शेतकऱ्यांचा आसूड(१८८३) इ. साहित्यकृतींतूनही मांडले. डॉ.साळुंखे यांच्या 'बळीवंश' या ग्रंथातून महात्मा फुले यांच्या उपरोक्त सिद्धातांना ज्ञानशाखेचे पुरावे प्राप्त झाले आहेत.

'बळीवंश' हा ४४८ पृष्ठांचा दहा प्रकरणांतून मांडणी केलेला ग्रंथ आहे. या ग्रंथाची अनुक्रमणिकाच इतकी वैशिष्ट्यपूर्ण आहे, की प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट असलेले विषय व मुद्दे कोणते आहेत, हे समजण्यास आपल्याला मदत होते. संदर्भसूचीत त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मूळ संस्कृत ग्रंथांतील श्लोक अथवा मंत्र दिले आहेत. अभ्यासकांना सत्यता पडताळून पाहता यावी, हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'बळीवंश' समजून घेण्यासाठी वाचकांना काही मूलगामी इतिहास, वैदिकांनी निर्माण केलेल्या पुराणकथा, देवासुरसंघर्ष, प्रक्षिप्त केलेल्या खोट्या कथा, ब्राह्मणांचे अवास्तव स्तोम, त्यांच्या लबाड्या, अनैतिकता, बढाया इत्यादी मूलगामी गोष्टी कळाव्यात म्हणून स्वतंत्र 'प्रास्ताविक' या शीर्षकाचे (पृ.१३ ते ३६) प्रकरणच त्यांनी लिहिले आहे.

बळीवंशमधील 'प्रास्ताविक' हे प्रकरण त्यांच्या दार्शनिक काव्यलेखनाचा व काव्यात्म गद्यलेखनाचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. बळीराजा हा 'कुळस्वामी' आहे, असे महात्मा फुले यांनी नमूद केल्याचा उल्लेख करून 'बळीवंश' या शीर्षक शब्दातून वांशिक भेद मांडावयाचे नसून व्यापक अर्थाने ही संज्ञा लेखकाने वापरली आहे. बळीचे दोन वंश देशात प्रवाहित आहेत. १.शरीरवंश आणि २. विचारवंश. येथील बहुजन समाजात बळीच्या शरीरवंशाची जैविक जनुके आहेतच, पण त्याच्या विचारवंशाची सांस्कृतिक जनुके अधिक लोकांमध्ये असल्याचे ते प्रतिपादन करतात.(पृ.१४).

तुळूनाडू या कर्नाटकाच्या भागात तुळू भाषेत 'बळी' हा शब्द 'वंश' या अर्थाने येतो, असे लेखकाने प्रा. पी. गुरुराज भट्ट यांचा संदर्भ देऊन सांगितले आहे.(पृ.१४). त्या भागातील ब्राह्मणांचा अपवाद वगळता इतर सर्व लोक कोणत्या ना कोणत्या बळीशी जोडलेले आहेत. लेखकाने प्रस्तुत ग्रंथात बळीवंशाचा जो इतिहास लिहिला आहे, त्याचा बहुतांश आधार वैदिकांनी निर्माण केलेल्या साधनांचा आहे. त्याबरोबरच काही लोककथा, लोकोक्ती, बहुजन समाजात रूढ असलेल्या मौखिक परंपरा इत्यादींचाही आधार आहे. वैदिकांनी बळीवंशाची मानहानी करण्यासाठी, त्यांच्या विजयाचेही चित्रण पराभवात करण्यासाठी, त्यांचे कर्तृत्व लपविण्यासाठी आणि वैदिकांच्या अनैतिकतेला पावित्र्याच्या संवरणाखाली झाकण्यासाठी ग्रंथ, मिथके, व्रते, कर्मकांडे, कलांची माध्यमे या सर्वांचा वापर केला. त्यांनी बळीचे चित्रण असत्य आणि अनैतिहासिक पद्धतीने केले. ''त्यांनी सत्य लपविताना वास्तव इतिहासाचे जे अनेक दुवे नजरचुकीने, अनवधानाने वा अहंकाराने मागे ठेवले आहेत, ते काळजीपूर्वक एकत्रित करून आपला विवेक वापरून इतिहासाची पुनर्मांडणी करण्याचा मार्ग मी स्वीकारला आहे.''(पृ.१४-१५), असे ते सांगतात. त्यांचे हे सत्यशोधन खूप शारीरिक- बौद्धिक परिश्रमाचे आणि दीर्घकाळ केलेल्या संशोधनाचे फलित आहे.

वैदिकांनी निर्माण केलेल्या कपोलकल्पित कथांच्या कचाट्यातून आजचा समाज देखील सुटलेला नसल्यामुळे त्यातून सुटका करण्यासाठी त्यांचे डोळस विवेचन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करून ते पुढे म्हणतात, ''अशा



Scanned with CamScanner

कथांचा अभ्यास भूतकाळात रमण्यासाठी, त्याचे ओझे वाहण्यासाठी करायचा नसून भारतीय समाजाचा वर्तमान काळ आणि भविष्य काळ प्रफुल्लित करण्यासाठी करायचा आहे.''(पृ.१६). या विधानातून ते भारतीय समाजाला एक आशावाद देतात.

उपरोक्त विवेचनानंतर डॉ.साळुंखे यांनी ऐतरेय ब्राह्मण आणि शतपथ ब्राह्मणातील कथा सांगून त्यांतील फोलपणा सिद्ध केला आहे.(पृ.१७-१९).

या कथा असे सांगतात, की पूर्वी यज्ञात बळी जायला पशू राजी नव्हते. पण पुन्हा राजी झाले, त्यांनी देवांचे म्हणणे मान्य केले. या संदर्भात ते म्हणतात, ''वैदिकांच्या संस्कृतीतील देव हे विशिष्ट जीवनशैली असलेले मानवी जनसमूहच होते. यज्ञयागादी संस्कृती वैदिकांची, आर्यांची वा तथाकथित देवांची होती. देवांच्या यज्ञात पशूंना सर्रास बळी दिले जात होते. पशूंचे पालनपोषण असुरांनी म्हणजे बहुजनांनी करायचे आणि त्यांच्या मांसावर वैदिक ब्राह्मणांनी ताव मारायचा. देवांच्या यज्ञात पशू बळी जायला तयार नव्हते, म्हणजे त्यांचे खाद्य बनायला तयार नव्हते. याचा अर्थ असा, की बळीवंशाचे राज्य होते, तेव्हा यज्ञ होऊ दिले जात नव्हते. त्यामुळे पशूंवर बळी जाण्याचा प्रसंग येत नव्हता. बळीवंशाचा जसजसा पराभव होत गेला, तसतसे यज्ञ सुरू झाले आणि पशूंना यूपांकडे (वधस्तंभ) जाणे भाग पडले. देव पशूंना यूपाला बांधून मारीत असत. त्यामुळे यूप हे देवांच्या हातातील वज्र बनले.''(पृ.१९). पशूंप्रमाणे बहुजन समाज यज्ञकर्माकडे खेचला जाऊ लागला. यात क्षत्रिय राजांचे प्रमाण जास्त होते. कारण, यज्ञाचा अमर्याद खर्च करण्याची क्षमता त्यांच्याकडेच होती. यज्ञादी कर्मकांडे केली नाहीत, तर आपल्याला इष्ट फळ मिळणार नाही, अनेक संकटे येतील, या काल्पनिक भीतीचा त्यांनी धसका घेतला. जसा राजा, तशी प्रजा, या उक्तीप्रमाणे मग बहुजन समाजही यज्ञाकडे खेचला जाऊ लागला. ब्राह्मणग्रंथांतील पशू हे बहुजन समाजावर केलेले रूपक आहे, असाही अर्थ त्यातून निघतो.

पशूंना यज्ञात बळी देण्याच्या क्रियेतील भाषाही ठकवाठकवीची आहे, हे वास्तव डॉ.साळुंखे यांनी शतपथ ब्राह्मणातील कथांच्या आधारे स्पष्ट केले आहे.(पृ२०-२१). देव आणि असुर हे प्रजापती, ब्रह्मदेव, कश्यप, विराट पुरुष इत्यादी आदिपुरुषांची अपत्ये मानली आहेत. अशा कथा, आख्यायिका आणि विधाने वैदिक वाङ्मयातून आढळतात, पण हे वैदिक गारूडही त्यांनी त्यांचे हितसंबंध जपण्यासाठी निर्माण केले आहे. सिंधू संस्कृतीच्या पराभवानंतर अवैदिक-वैदिक यांच्यात संकरही होत होते. देव, असुर, भाई-भाई ही घोषणा हिंदी चिनी भाई-भाई या घोषणेप्रमाणेच ढोंगीपणाची आहे. (पृ.२३-२४). असे लेखक सांगतात. वैदिकांनी देव-असुर ही प्रजापतीची अपत्ये आहेत, असे लिहिले. यात समतेचा दृष्टिकोण नव्हता, तर बहुजनांच्या कष्टावर आयते बसून खाण्यासाठी स्वतःच्या ऐषआरामासाठी आणि विकासासाठी या कथांचे निर्माण केलेले आहे. कामापुरता मामा, असेही त्यांच्या मतलबी धोरणाचे वर्णन डॉ.साळुंखे करतात.(पृ.२४).

वैदिक मैत्रायणी संहितेत प्रजापतीने घृणास्पद असा पक्षपात केला असून, या कथा वडील व अपत्य यांच्या नात्याला कलंकित करणाऱ्या आहेत, असा अभिप्राय दिला आहे. शतपथ ब्राह्मणात तर असुरांची निर्मिती अपान (गुदद्वारातून बाहेर पडणाऱ्या) वायूतून झाली असल्याचे सांगितले आहे (पृ.२५-२६), हे डॉ.साळुंखेंनी नोंदविले आहे. या अशा कथा लिहून त्या बहुजन समाजावर थोपल्या आहेत. वास्तव असे आहे, की मूळचे जे धन, संपत्ती आणि नगरे असुरांची होती, ती सर्व देवांनी लुबाडली. मैत्रायणी संहितेत हा पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.(पृ.२७-२८). तैत्तिरीय ब्राह्मण सांगते, की देवांनी असत्याच्या आधारे असुरांचा पराभव केला.(पृ.२८-२९). हेच ब्राह्मण आणखी सांगते, की देवांनी असुरांचे मूळ निवासस्थानही नष्ट केले.(पृ.२९-३०). या सर्व विवेचनाचा अर्थ असा होतो, की देव आक्रमक, हिंसक, क्रूर, लुटारू होते. ते या भूमीचे मालक असलेल्या असुरांच्या मुळावर आले. मूळ रहिवाशांना महात्मा फुले क्षेत्रज म्हणतात.



Scanned with CamScanner

वैदिक लोक एकीकडे कृष्णाला पूज्य आणि पवित्र मानतात, तर दुसरीकडे विष्णुपुराणात कृष्णाचा अपमान करणाऱ्या कथा आहेत. विष्णुपुराणाचे हिंदी अनुवादक चित्राव शास्त्री यांच्या प्राचीन चरित्रकोशाच्या आधारे विष्णुपुराण काय सांगते, याचे विवेचन डॉ.साळुंखे यांनी केलेले आहे. कृष्ण हा विष्णूचा अवतार आहे, असे विष्णुपुराण मानते. तरीही त्याचा मृत्यू दुर्वास मुनीच्या शापामुळे होतो.(पृ.३०-३१). या कथेचे साळुंखेंनी विस्तृत वर्णन केले आहे. मात्र या कथेचा अभिप्राय देताना ते म्हणतात, की ही कथा वर्णवर्चस्व लादण्यासाठी निर्माण केली आहे. ही कथा वाचून मस्तकातील आग सभ्य शब्दांत व्यक्त करताना फार-फार सायास पडतात (पृ.३१), असे सांगून ते आणखी पुढे म्हणतात, वर्चस्वगंडांचे किती अमंगळ किल्मिष या कथाकारांच्या मनात भरले होते, त्याचा क्लेशदायक अनुभव त्यांच्या या मांडणीतून येतो.(पृ.३१). कृष्ण हा बहुजनातील लोकोत्तर पुरुष. त्याच्या श्रेष्ठत्वापुढे कोपिष्ट दुर्वासाचे माहात्म्य पासंगाइतकेही मानणे शक्य नाही. तरी देखील दुर्वासाच्या उष्ट्या पाण्याचाही खोटा गौरव, त्याचे उष्टेपणही सोवळे आणि इतरांचे गुणाधिष्ठित सोवळेपणही ओवळे(पृ.३१), असे लेखक सांगतात व 'अमूलम् एव लिख्यते सर्वम्' या उक्तीप्रमाणे आपण सर्व काही निराधार लिहू, अशा प्रकारचे अनैतिक व्रत स्वीकारूनच वैदिकांनी हे सर्व लिहिलेले आहे. मुद्रणकला नव्हती, तेव्हा ग्रंथाच्या प्रती तयार करणाऱ्या कारकुनी लोकांनी सोयीचा मजकूर प्रक्षिप्त करण्याची लुडबूड केली आहे. 'हरिवंश' या ग्रंथाला डॉ.पी.एल.वैद्य यांची जी प्रस्तावना आहे, तिचा हवाला देऊन डॉ.साळुंखेंनी हे स्पष्ट केले आहे.(पृ.३२). अशा एक नाही हजारो कथांची पार्श्वभूमी लक्षात घेतली असता बळीवंशाला करावी लागलेली लढाई किती अवघड होती, हे समजते. स्वातंत्र्यासाठी अधिकात अधिक किती मोल देणे शक्य असते, हे जाणून घेण्यासाठी बळीवंशाचा इतिहास अभ्यासावा. बळीवंशाला कुटिल बुद्धीची धारदार नखे आणि तीक्ष्ण दात असलेल्या हिंस्र आणि विश्वासघातकी शत्रूंबरोबर लढावे लागले. अशा शत्रूंशी लढताना बळीवंशाची स्वातंत्र्याची आकांक्षा किती प्रबळ होती, त्याचे मातृभूमीवरचे प्रेम किती उत्कट होते आणि आपल्या अस्तित्वावरची अतिक्रमणे हटविण्याचा त्याचा निर्धार किती दृढ होता, याचे ओझरते दर्शन बळीवंशातील पुढील प्रकरणांतून घडेल.

वैदिकांनी बहुजनांच्या बौद्धिक स्वातंत्र्यावर लादलेली सर्व बंधने झुगारून देऊन आणि सर्व गोष्टी आपल्या विवेकाच्या कसोटीवर घासून घेऊन बळीवंशाचे हे दर्शन करताना प्रस्थापितांनी पाखंडीपणाचे लाख आरोप केले, तरी त्यांची पर्वा करण्याचे कारण नाही. त्यांना जे निंद्य पाखंड वाटते, तो अत्यंत गौरवशाली आणि अभिमानास्पद असा आपल्या स्वत्वाचा उमदा आविष्कार ठरणार आहे (पृ.३६), असा विश्वास डॉ.साळुंखे प्रस्तावनेच्या पहिल्या प्रकरणातून व्यक्त करतात. तो भारतातील सुर-असुर संघर्षाच्या इतिहासाची साक्ष देणारा आहे.

संस्कृतीच्या युद्धभूमीवर विविध जनसमूह या दुसऱ्या प्रकरणात देव-असुर या सांस्कृतिक युद्धातील नायक कोण होते आणि खलनायक कोण होते, हे वास्तव लेखकाने अनेक उदाहरणांच्या माध्यमातून नेमकेपणाने दाखविले आहे. बळीवंशातील लोक हे क्षत्रिय राजे होते, पण त्यांचा निर्देश वैदिक वाङ्मयात कुत्सितपणाने दानव किंवा राक्षस म्हणून करण्यात आला आहे. वास्तविक पाहता देव-असुर लोक हे मानवच होते, हे ध्यानात घेतल्याशिवाय प्राचीन इतिहास नीटपणे समजत नाही. देव म्हणजे आर्य लोक आणि मानव ज्ञातिसंघच होते, हे सांगून पिशाच हेही मानवच होते, हे वास्तव डॉ.साळुंखे यांनी चित्राव शास्त्री यांच्या लेखनातील संदर्भ देऊन स्पष्ट केले आहे.(पृ.३७-३९).

लौकिक-पारलौकिक किंवा असुर-देव या सांस्कृतिक संघर्ष करणाऱ्या असुरांच्या बाजूने असलेल्या जनसमूहांची माहिती डॉ.साळुंखे यांनी विविध ग्रंथ आणि विद्वानांच्या मतांच्या आधारे दिली आहे. त्यांचा फक्त निर्देश करणे येथे प्रस्तुत होईल. १ पणि, २ दैत्य, ३ दानव, ४ राक्षस, ५ दास, ६ दस्यु इत्यादी सर्व जनसमूह देवांपेक्षा (आर्यांपेक्षा) वेगळी जीवनमूल्ये मानणारे होते आणि ते फार प्रभावी होते. देवांचा त्यांच्यावर टोकाचा राग होता. म्हणून त्यांनी अनेकदा त्यांची हत्या केली. ऋग्वेदात त्यांच्या संघर्षाला 'दस्युहत्या' म्हटले आहे. (पृ.६९-७१). महात्मा फुले यांनी पोवाडा लिहून दस्यूंचा गौरव केला आहे.



Scanned with CamScanner

हे सर्व जनसमूह आता ओळखायचे कसे, हा प्रश्न आहे आणि तो अनुत्तरित राहिलेला आहे. कारण, हजारो वर्षांत त्यांच्यात संघर्ष आणि समन्वय झाले. संकर झाले. अनेक बाबींची देवघेव झाली. त्यांनी कधी अलगपणा जपला, तर कधी ते एकमेकांत मिसळून गेले. डॉ.साळुंखे याविषयी नेमकेपणाने सांगतात. प्राचीन भारतामध्ये विविध जनसमूहांचे आपापसांत खूप संघर्ष झाले. या संघर्षांमध्ये खूप लोक मारले गेले. या संघर्षांनंतर काही मोजके लोक भारतभूमीच्या सीमा ओलांडून बाहेर गेले असतील, पण बाकीचे लोक भारतभूमीमध्येच राहिले, हे उघड आहे. ते इकडे-तिकडे सरकले असतील. आपला ठावठिकाणा बदलत राहिले असतील. कसेही मानले, तरी ते भारतीय समाजाचा अविभाज्य भाग बनले, यात शंका नाही.(पृ.७१-७२). असे सांगून ते पुढे म्हणतात, की भारतीय समाजाच्या अनार्यांचे व आर्यांचे रक्त वाहत आहे, हे वास्तव स्वीकारले पाहिजे. स्वत:वर फक्त आर्यत्वाचा शिक्का मारून घेणे म्हणजे आपले खरे स्वरूप समजून न घेणे, ते विसरणे आणि आपणच आपला द्वेष केल्याप्रमाणे आहे, त्यामुळे दुसऱ्याच्या नजरेने पाहणे सोडून देण्याचा मौलिक सल्ला ते देतात.

'प्रारंभीचे संघर्ष' हे तिसरे प्रकरण होय. या प्रकरणात आर्यांच्या आक्रमणानंतर आणि बळीराजाच्या पूर्वी अनेक असुर राजांनी आर्यांशी प्राणपणाने संघर्ष करून आपले स्वत्व जपण्याचा प्रयत्न केल्याचे वर्णन आहे. त्यासाठी ज्या ज्या महानायकांनी आर्यांशी संघर्ष केला, त्या सिंधू संस्कृतीतील असुर राजांची माहिती घेतली पाहिजे. आपली मुळे कुठे आहेत आणि कशी आहेत, ती प्राचीन काळात कुठंपर्यंत खोलवर आणि दूरपर्यंत पसरली होती, हे समजून घेणे आपले कर्तव्य आहे. या प्रकरणात लेखकांनी त्या संघर्षाच्या कथा दिल्या आहेत, हे समजून घेणे आपले कर्तव्य आहे. त्या कथा वाचकांनी मुळातून वाचाव्यात. येथे फक्त त्या महानायकांचा नामोल्लेख करणे प्रस्तुत ठरेल.

शिव-पार्वती, वीरभद्र, अवैदिक गणपती, शंबर, नमुचि, मधु आणि कैटभ, वृत्र, मारुति, त्वष्टा विश्वकर्मा आणि मय.

शतपथ ब्राह्मणाचा काळ इ.स.पूर्व १००० वर्षे असा आहे. भारतीय समाजात निर्माण झालेल्या अस्पृश्यतेची बीजे या काळातच रुजू लागली होती. जे लोक असुरांच्या संस्कृतीची निर्मिती करण्यात आघाडीवर होते, ते (असुर) पराभूत झाल्यानंतर वैदिकांनी त्यांच्याकडून आपल्यासाठी कामे करून घेतली व नंतर त्यांना अस्पृश्य मानायलाही सुरुवात केली, असे दिसते.(पृ.९४).

'बळीच्या पूर्वजांची स्वातंत्र्ययुद्धे' हे चौथे प्रकरण होय. या प्रकरणात बळीवंशाच्या इतिहासाची सुरुवात हिरण्यकशिपूपासून केली आहे. हिरण्यकशिपूचे पूर्वज त्यांच्यापेक्षाही कर्तबगार असण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यांची चरित्रे साधनांअभावी उपलब्ध नाहीत. या प्रकरणात लेखकांनी वेद, पुराणे आणि ब्राह्मण ग्रंथांतील कथांची चर्चा केली आहे. येथे असुर राजांचा फक्त नामोल्लेख करत आहे-हिरण्याक्ष, हिरण्यकशिपू, प्रल्हाद, विरोचन, बळीराजा.

'बळीराजा- सात काळजांच्या आत जपून ठेवावा असा जिवलग' हे पाचवे प्रकरण होय. या प्रकरणात असुरांच्या चौथ्या पिढीतील संर्घषाचा वास्तव इतिहास लिहिला आहे. तो समग्र इतिहास नाही, असे लेखकांनी पुन्हा-पुन्हा नमूद केलेले आहे. बळी आणि वामन यांच्या संदर्भात वामनपुराणात, महाभारताच्या उद्योगपर्वात आणि सभापर्वात, पद्मपुराणात, श्रीमद्भागवत पुराणात व इतर वैदिक वाङ्मयातून कथा आलेल्या आहेत. या सर्व कथांमधून वैदिकांनी बळीचे व्यक्तिमत्त्व व चारित्र्य दूषित करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकांनी बळीवंशातील संस्कृती शांततापूर्ण आणि अहिंसक होती, देवाच्या यज्ञसंस्कृतीप्रमाणे हिंसक आणि लुटारू नव्हती, काही कथांमधून बळीलाच बळीचा शत्रू ठरविले आहे व बळीला ब्राह्मणद्वेष्टा ठरवून त्याचे चारित्र्यहनन केले असल्याचे स्पष्ट केले. बळीराजा हा प्रजाहितदक्ष, सहिष्णू, दानशूर, पराक्रमी, तत्त्वनिष्ठ, नैतिक होता, तरीही पुराणकारांनी त्याचे चारित्र्यहनन का केले, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरातच देव आणि असुर यांच्या प्रदीर्घ संघर्षाचे उत्तर दडलेले आहे. हा संघर्ष समजून घेणे म्हणजे भारताचा इतिहास खऱ्या अर्थाने समजून घेणे होय.

Scanned with CamScanner

बळीचे पूर्वज आणि बळीचे वंशज याच संघर्षाचे बळी ठरले. त्यांच्या मूल्यांसाठी त्यांनी प्राणार्पण केले, पण तडजोड स्वीकारली नाही, असे महत्त्वाचे विवेचन करताना ते म्हणतात, ''ब्राह्मणांनी अहंकारापोटी केवळ गैरवाजवीच नव्हे, तर अत्यंत अन्याय्य अशा गोष्टींची अपेक्षा बाळगली होती. बळीने व त्याच्या बळीवंशातील इतर राजांनीही ती पूर्ण केली नाही. बाकीच्या प्रजेची उपेक्षा करून ब्राह्मणांना (ब्राह्मण म्हणून) झुकते माप द्यायचे त्यांनी नाकारले. सर्व प्रजेला समान मानण्याची संतुलित वृत्ती त्यांनी बाळगली. त्यांचे हे विवेकी वर्तन आणि ब्राह्मणांना इतरांवर सर्वांगीण वर्चस्व गाजविण्याचा विशेषाधिकार देण्यास त्यांचा असलेला स्पष्ट विरोध हाच ब्राह्मणांना आपला द्वेष वाटत होता, आपला छळ वाटत होता.''(पृ.१५४).

लोकांनी 'इडा पीडा जावो अन् बळीचे राज्य येवो' या वचनातून बळीच्या पुनरागमनाची आशा आजही जिवंत ठेवली आहे. बळीच्या राज्यात सर्व माणसे समान होती, हा आशय व्यक्त करणारे मल्याळम भाषेतील एक लोकगीत डॉ.साळुंखे यांनी उद्धृत केले आहे.(पृ.१९९-२००). बळीराजाच्या पुनरागमनाची प्रतीक्षा लोक हजारो वर्षांपासून करतात, एवढा तो जिवलग आहे (पृ.२००), एवढा लोकप्रिय राजा बळीराजा होता.

यानंतरच्या सहाव्या प्रकरणात वामनाच्या तीन पावलांचा खरा अर्थ लेखकाने स्पष्ट केला आहे, तर सातव्या प्रकरणात बळीच्या कर्तबगार वंशजांचा इतिहास सांगितला आहे.

यानंतरच्या आठव्या प्रकरणात बळीच्या वर्तमान काळातील विचारवंशाशी नाते सांगणाऱ्या व्यक्ती, चळवळी व पंथ यांविषयीचे विवेचन लेखकाने केलेले आहे. त्याचे विस्तृत विवेचन न करता बहुजनांच्या पराभवाची कारणे संक्षेपाने पहायची आहेत. पण तत्पूर्वी नवव्या प्रकरणातून वैदिकांनी दक्षिण आणि नैर्ऋत्य दिशा अशुभ मानल्या आहेत, याविषयीचे विश्लेषण लेखकाने केले आहे. दक्षिणेकडील केरळ, तामिळनाडू भागात बळीराजाला वंशप्रवर्तक पूर्वज मानले जाते. कांचिपुरम येथे बलिचक्रवर्तींचे मंदिर आहे. तामिळनाडूत बळी फक्त बळी नाही, तर महाबली आणि चक्रवर्ती असल्याचे उल्लेख आजही पहावयास मिळतात. यावरून दक्षिण आणि नैर्ऋत्य दिशांना वैदिक अशुभ मानत असले, तरी दक्षिणेत बहुजन समाजात बळीराजाविषयी अमर्याद आदरभाव आहे, हे लेखकाने के.व्ही.भट्ट यांच्या संशोधनाच्या आधारे स्पष्ट केले आहे. तुळूनाडू ही बळीराजाची भूमी मानली जाते. सिंधू संस्कृती ही बळीवंशाची होती आणि त्या संस्कृतीची व भूतपूजा किंवा भूताराधनेची रूढी आजही तेथे आहे. तेथे बळी हा शब्द वंश या अर्थाने वापरला जातो, असे प्रा. पी.गुरुराज भट्ट यांच्या 'स्टडीज इन तुळुव हिस्टरी अँड कल्चर' या ग्रंथात सांगतात. त्यांच्या ग्रंथातील अनेक इंग्रजी अवतरणे डॉ.साळुंखे यांनी उद्धृत केली आहेत.(पृ.३२४-३३३).या प्रदेशात ब्राह्मण सोडून सर्व जातींचे लोक बळीराजाशी नाते सांगतात.

बळी म्हणजे घराण्याचे नाव उज्ज्वल करणारा, वंशाला उजळून टाकणारा, कर्तृत्वावर वंशप्रवर्तन करणारा, असा बळी या शब्दाचा अर्थ आहे.(पृ.३२४). डॉ.साळुंखे बळीराजाला वैदिकांची शोषक व्यवस्था नाकारणारा समाजशिल्पकार असे म्हणतात, ते यथार्थच आहे.

बहुजनांच्या पराभवाची कारणे हे दहावे आणि वर्तमानकाळाच्या संदर्भात महत्त्वाच्या मुद्द्यांची चर्चा करणारे प्रकरण आहे. डॉ.साळुंखे प्राचीन भारताच्या वैदिक-अवैदिक संघर्षाचा इतिहास सांगतात. पण त्या काळातच हरवून जात नाहीत. इतिहासातून काही बोध घ्यावा लागतो. इतिहासातून चांगल्या जीवनमूल्यांच्या प्रेरणा घ्याव्या लागतात, चांगल्या जीवनशैलीचे आदर्श घ्यावे लागतात. त्या काळातील सामाजिक उणिवा, दोष, न्यूनता, वैमनस्य यांचा त्याग करावा लागतो. या दृष्टीने ते त्यांच्या संपूर्ण लेखनात आवर्जून विवेचन करतात. ते या प्रकरणात म्हणतात, की पराभव हा वाईटच असतो. एखाद्या समाजाचा मोठा पराभव तर फार फार वाईट असतो. अशा मोठ्या पराभवाचे दुष्परिणाम केवळ पराभूत होणाऱ्या एका पिढीपुरते किंवा काही मोजक्या पिढ्यांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर तो जणू काही त्या समाजाच्या वंशबीजालाच पराभूत करतो. (पृ.३४९).



Scanned with CamScanner

या ग्रंथातील बहुजनांच्या पराभवाची लेखकांनी दिलेली मोजकी कारणे जाणून घेणे प्रस्तुत ठरेल.

१. वैदिकांची कोड्यात टाकणारी आणि खोड्यात अडकविणारी वर्तननीती हे महत्त्वाचे कारण आहे. त्यांची धर्मसूत्रे, पुराणे आणि वेदज्ञ ब्राह्मण सांगतात एक, वर्तन मात्र वेगळेच असते. त्यांच्या वेगळ्या वर्तनाला धर्मसूत्रांचाच आधार असतो. वेगवेगळ्या काळात आणि वेगवेगळ्या अनेक तोंडांनी बोलत आलेले आहेत. अब्राह्मणी परंपरेतील फार मोजक्या प्राच्यविद्या अभ्यासकांना त्यांचे कोडे समजू शकले आहे. त्यात डॉ.साळुंखे हे महत्त्वाचे विचारवंत आहेत.

२. वैदिकांनी बहुजनांच्या मनावर कब्जा करून त्यांना पराभूत केले. या संबंधीची मैत्रायणी संहितेतील कथा आहे. मैत्रायणी संहिता सांगते, की देवांनी असुरांच्या मनावरच कब्जा केला. ते मनाने पराभूत झाले. ज्याला शत्रू असतात, त्यांनी यज्ञ करावा असे सांगून क्षत्रियांना यज्ञ करायला लावायचा आणि त्यांच्या मनावर कब्जा करून आपला मतलब साधून घ्यायचा. या संदर्भात शतपथ ब्राह्मणात आलेली च्यवन भार्गव या भणंग ब्राह्मणाने राजा शर्यात याला शरण आणल्याची कथा आलेली आहे.

३. फाटाफूट- ब्राह्मणांनी वडील-पुत्र, भाऊ-भाऊ, चुलते-पुतणे यांच्यात भांडणे लावली, कुटुंबकलह निर्माण केले.. राजा-प्रजा, राजा-प्रधान, राजा आणि राजपत्नी असेही कलह निर्माण केले. उपरोक्त कथा फाटाफुटीचे उदाहरण म्हणूनही विचारात घेता येते. या संदर्भातील कॉ.शरद पाटील यांच्या दास शूद्रांची गुलामगिरी या ग्रंथातील अट्ठकथेतील वस्सकार ब्राह्मणाने लिच्छवी गणात भांडणे लावल्याची कथा डॉ.साळुंखे यांनी उद्धृत केली आहे. शेवटी कोणत्याही ब्राह्मणाने, देवाने स्वत: लढाया कधीच केल्या नाहीत. अशा छुप्या पद्धतीने, कटकाव्याने लढूनच ते विजयी होत असल्याचा अभिप्राय ते देतात.

४. यादवी- साजातील अंतर्गत संघर्ष, वैर किंवा हिंसाचार यासाठी यादवी हा शब्द वापरला जातो. द्वारकेतील यादवांच्या हिंसाचाराची आणि परस्परांशी वैराने संघर्ष करून त्यांचा सर्वांचा विनाश झाल्याची कथा सर्वविदित आहे. यादवांच्या दुहीमागे ब्राह्मणांचे कारस्थान होते (पृ.३६०-३६१), असे डॉ.साळुंखे सांगतात.

५. फितुरी- असुरांमध्ये फितुरी निर्माण करून त्यांना देवांनी पराभूत केले. एकूण भारताच्या इतिहासात वारंवार आढळणारे हे वास्तव आहे. अशी असंख्य उदाहरणे वैदिक वाङ्मयात आहेत. फितूर होणारे राक्षस, असुर म्हणजे कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ ठरले.

६. देवांकडून स्त्रीचा साधन म्हणून वापर- काही असुर हे स्त्रियांच्या मोहाला बळी पडत असत. शतपथ ब्राह्मण, महाभारताचे आदिपर्व वगैरे वाङ्मयात यासंबंधीच्या काही अतिशयोक्त आणि विकृत कथा आल्या आहेत. सुंद व उपसुंद आणि तिलोत्तमेची कथा, (पृ.३७१-३७९) मोहिनी आणि भस्मासुर कथा (पृ.३७९) इत्यादी कथांमधून देवांनी त्यांना विजय मिळावा यासाठी स्त्रियांचा साधन म्हणून वापर केला. थोडक्यात काय तर देवांनी मोह, सत्ता, अधिकार, संरक्षण, खोटी प्रतिष्ठा, क्षुल्लक स्वार्थ यांसाठी स्त्रीचा वापर केला, हे वास्तव आहे. काही असुरही उपरोल्लेखित कारणासाठी मोहाला बळी पडले. त्यामुळे मोठमोठे विद्रोह होऊनही वैदिक व्यवस्था उलथून पडली नाही. हे कठोर वास्तव लेखकाने सांगितले आहे.(पृ.३८५-३८९). हा इतिहास मुद्दाम मुळातून वाचला पाहिजे.

वैदिक संस्कृतीचा प्राण ज्या मानवद्रोही जीवनमूल्यांत आहे, त्यावर अचूक आघात करून ती मूल्ये मुळातून उखडून टाकावी लागतील. असुरांचे काही पराभव जीवनमूल्यांच्या दृष्टीने विजयापेक्षाही सरस आहेत. पण विजय हा विजयच असतो. असुरांचा इतिहास विजयाचा आहे. देवांनी मात्र त्यांच्या हातात लेखण्या असल्यामुळे तो इतिहास देवांच्या विजयांचा आहे, असे विकृत आणि असत्य लेखन केले. बळीवंशाचा विजय अटळ आहे, ही जिद्द मनात हवी. त्या दिशेने सम्यक प्रयत्न व्हायला हवेत, असे डॉ.साळुंखे यांचे मत आहे.



Scanned with CamScanner

**समारोप**

बळीवंशाच्या शेवटच्या प्रकरणात लेखकाने प्राचीन बळीवंशाचा इतिहास समजून घेतल्यानंतर त्यांच्या भविष्यकाळाविषयी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत, ते असे :

१. आपल्या भाषेतील अब्राह्मण, ब्राह्मणेतर, अनार्य, आर्येतर हे शब्द अभावात्मक अर्थाचे आहेत. तर राक्षस, असुर हे शब्द भावात्मक आहेत. ते आपली खरी ओळख करून देतात. मात्र वैदिकांनी अपप्रचार करून त्यांना कुरूप, विरूप व विद्रूप केले आहे. याला लेखकांनी सुजन हा शब्द पर्याय दिला आहे.(पृ.३९३).

२. वैदिकांनी आपल्या साहित्यात अमर्याद असत्ये मांडली आहेत. त्यामुळे खऱ्या सिंधुजनांचा-निर्मळ, निरागस चेहरा हरवून गेला आहे. खोटेपणाने पर्वतच्या पर्वत उभे केले.

३. वैदिक परंपरेने सर्वसामान्य लोकांना जाणीवपूर्वक ज्ञानापासून वंचित ठेवले. वरून खोट्या-नाट्या भाकड कथा रचून अंधश्रद्धेच्या माध्यमातून वर्चस्व राखले. मात्र या सर्व गतिरोधकावर मात करून बहुजन समाजातील लेखक, विचारवंत, विविध क्षेत्रांत जिज्ञासा, व्यासंग, कष्ट आणि द्रष्टेपण यांच्या जोरावर कर्तृत्वाने वर्चस्व प्रस्थापित करीत आहेत.

४. आपल्याला आपले स्वतंत्र काव्यशास्त्र निर्माण करावे लागेल.(पृ.३९७-३९८). तसा प्रयत्न डॉ.शरद पाटील यांनी केल्याचे लेखक सांगतात.

५. वैदिक परंपरेच्या मूल्यव्यवस्थेवर मुळातून घाव घातला पाहिजे. त्यांना डिवचून न सोडता त्यांची प्रतिकारशक्ती कायमची नष्ट केली पाहिजे. नाही तर दबा धरून बसलेले वैदिक पुन्हा आपले डोके वर काढतात.

६. बळीराजा पराभवातही खचून जात नाही. तो लोकतत्त्वांचे संपूर्ण ज्ञान असलेला खंबीर मनाचा होता.

७. क्षत्रिय असलेल्या विश्वामित्राचा गायत्री मंत्र वैदिकांनी पळविला. सवितृ म्हणजे सूर्य, ऋग्वेदातील या ऋचेची देवता म्हणून या ऋचेला सावित्री विशेषण प्राप्त झाले. क्षत्रियांनी रचलेला हा मंत्र म्हणण्याचा अधिकार वैदिक ब्राह्मणांनी क्षत्रियांना नाकारला.

महात्मा फुले या मंत्राला अस्सल बीजमंत्र म्हणतात. या मंत्राच्या संदर्भात वर्णसंघर्षाचा इतिहास पहावा लागतो. वैदिक लोक कधीच दानशूर नव्हते. हा मंत्र ब्राह्मणांनी सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा प्राप्त करण्याचे साधन म्हणून वापरला.

या मंत्राकडे महात्मा फुले यांच्या दृष्टिकोणातून स्वतंत्रपणे पाहावे आणि आपला वारसा जपावा. आपल्या पूर्वजांनी त्यांच्या त्यांच्या काळात उत्तुंग कर्तृत्वाचे पर्वत उभे केले. वैदिकांनी त्याचे विकृतीकरण करून ब्राह्मणीकरण करून स्वार्थासाठी त्याचा गैरवापर केला. म्हणून सत्ता संपत्ती महत्त्वाची असली, तरी माणूसकीपेक्षा तिला महत्त्व देऊ नये व संकुचित महत्त्वाकांक्षेच्या वरवंट्याखाली माणूसकी रगडू नये.

८. बळीराजा, त्याचे पूर्वज आणि त्यांचे वंशज ही आपली मुळे आहेत. भूतकाळाच्या भूमीत ती खोलवर आहेत. ती दिसत नाहीत, म्हणून त्यांना विसरू नये. वर्तमानाच्या वृक्षाचा शेंडा होताना, आपण त्या मुळावर उगवलेल्या वृक्षाशी नाते ठेवावे. त्यांना झिडकारू नाकारू नये, नाते तोडू नये, असे आवाहन डॉ.साळुंखे करतात.(पृ.४०६-४०७).

९. बळीराजाने या भूमीत जीवन पेरले, ती पेरणी जनवादी मूल्यांची होती. म्हणून बळीराजा प्रत्येक पिढीच्या श्वासोच्छ्वासात आहे. रक्तवाहिन्यांतून वाहत आहे. उरातून धडधडत आहे. घराघरातून बहरत आहे. उत्कट जिज्ञासेने सृष्टीच्या आणि जीवनाच्या नव्या-नव्या रहस्यांचा शोध घेत आहे. (पृ.४०७).

अशा पद्धतीने डॉ.साळुंखे यांनी 'बळीवंश' हा महान ग्रंथ लिहून बहुजन समाजाला बळीराजाची खरी ओळख करून दिली. बळीचे पूर्वज व वंशज यांचे जैविक नाते आजच्या वर्तमानातील प्रत्येक बहुजनासोबत जोडले आहे.

*(संदर्भ : बळीवंश, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथम आवृत्ती-२००५, पुनर्मुद्रण डिसेंबर २०१३)*

■ ■ ■



Scanned with CamScanner